**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे सामाजिक जाणीव जपणारे कार्य कौतुकास्पद - कुलगुरू

अमरावती.

विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यप्रेरणेतून केलेले सामाजिक जाणीव असणारे कार्य कौतुकास्पद असून सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी व्यक्त केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह निमित्त महामानवाच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठातील मागासवर्गीय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्यावतीने भूमिपूत्र कॉलनी येथील बहुजन हिताय सोसायटी संस्थेद्वारे संचालित सोलेरा वसतीगृह येथे दोन मुलींच्या संपूर्ण वार्षिक खर्चाचे दायीत्व स्वीकारले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. जे.डी. वडते, विद्यापीठ शिक्षकेत्तर मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. नितीन कोळी, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे कार्याध्यक्ष श्री अजय देशमुख, अधिसभा सदस्य डॉ. रविंद्र सरोदे, सोसायटीचे सचिव धम्मचारी अमित आयुष्य उपस्थित होते.

विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघाद्वारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबविले. संघाद्वारे सांघीक योगदानातून गोळा झालेल्या मदतीतून दोन मुलींचे दायित्व स्वीकारले, त्यासाठी संघातर्फे रु. ५२,०००/- चा धनादेश कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या शुभहस्ते सोसायटीचे सचिव धम्मचारी अमित आयुष्य यांना प्रदान करण्यात आला. याशिवाय सोसायटी मार्फत चालविल्या जात असलेल्या स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असलेली रूपये दहाहजार किमंतीची अद्ययावत पुस्तके सुध्दा मागासवर्गीय संघटनेद्वारे प्रदान केली.

कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघाचा समाजोपयोगी उपक्रम स्तृत्य असून सर्वांना प्रेरणादायी आहे, बाबासाहेबांनी केलेले महान कार्य व त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्यभर केलेल्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकून संबोधित करतांना विद्यार्थ्यांना ते म्हणाले, बहुजन हिताय सोसायटी सारख्या संस्थेच्या माध्यमातून गरीब व मागासवर्गीय मुलींना शिक्षणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहे. त्यामध्ये सामाजिक मने जपणारी विद्यापीठ मागासवर्गीय संघटनेची मदत होते, ही कौतूकास्पद बाब आहे. आपण समाजाला देणे लागतो, ही भावना या संघटनेने जपली असून संघटनेचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी सुद्धा मार्गदर्शन केले.

कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी सुद्धा या कार्यात स्वयंस्फुर्त सहभागी होवून त्यांचेकडून वसतीगृहातील एका मुलाच्या वार्षिक खर्चाचे दायित्व स्वीकारले. तसेच एका मुलाच्या संपूर्ण शिक्षण खर्चाचे पालकत्व स्वीकारले. विद्यापीठ मागासवर्गीय संघटनेच्यावतीने याप्रसंगी सर्वांना बुंदीचे लाडू व चाकलेट देवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा आनंद साजरा केला.

कार्यक्रमाला मागासवर्गीय संघटनेचे पदाधिकारी सर्वश्री श्रीकांत तायडे, प्रमे मंडपे, शरद गवई, प्रेमानंद तिडके, गौतम सिरसाट, नरेंद्र खैरे, रमेश जाधव, रत्नशिल खोब्रागडे, पंजाब मनवरे, मिलिंद मेश्राम, विठ्ठल मरापे, राजेश सवई, विनोद लांजेवार, बहुजन हिताय सोसायटीचे व्यवस्थापन मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक, वसतीगृहातील मुले-मुली बहुसंख्येने उपस्थित होते.

---

**जनसंपर्क विभाग**
दि. १६/०४/२०१८.

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी